मसुदा
क्र. ७/२०१५-१६

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठ

व्यवस्थापन परिषदेची सभा शनिवार, *दिनांक १६ जानेवारी, २०१६ रोजी सध्याकांळी ४.००* वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२, येथे सुरू झाली. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. संजय व्ही. देशमुख, (कुलगुरू)

२. श्री. सिध्दार्थ खरात (उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

३. श्री. शैलेद्र देवळणकर (सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग)

४. डॉ. अनिल पाटील, (संचालक, बी.सी.यु.डी.)

श्री. अ.आ. फळणीकर, वित्त व लेखा अधिकारी आणि श्री. दिपक वसावे, परीक्षा नियंत्रक हे कायम निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

➢ श्रध्दांजली -

श्री. राजेश विवेक

जेष्ठ अभिनेता राजेश विवेक यांचे हयविकाराच्या झटक्याने दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६६ वर्षाचे होते.

तसेच मुंबई विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी जे या काळात निधन पावले त्यांनाही श्रंध्दाजली वाहण्यात येत आहे.

बाब १: दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

बाब २: दिनांक ३० डिसेंबर, २०१५ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, ३० डिसेंबर, २०१५ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

बाब ३: महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाणसंहिता (शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या सेवा व शर्ती)नियमावली, १९८४ रद्द करून सामायिक परिनियम (Common Statute) लागू होईपर्यंत शिक्षकेत्तर कर्मचा-यांची प्रकरणे विद्यापीठे/सहसंचालक/संचालक (उच्च शिक्षण /तंत्र शिक्षण )यांनी यापुढे महाराष्ट्र नागरी सेवा नियमांतील तरतूदीनुसार हातळणेबाबत.

ठराव : **असा ठराव करण्यात आला की,** प्रस्तावित नवीन समायिक **परिनियम** (Common Statute) **अस्तित्वात येईपर्यंत विद्यापीठ** स्तरावरील गट 'अ' 'ब' 'क' व 'ड' मधील **शिक्षकेत्तर कर्मचा–यांच्या पदोन्नत्या** हया महाराष्ट्र नागरी सेवा **नियमामधील निकष /नियम व अनुषंगिक तरतुदी व वेळोवेळी निर्गमित झालेले व होणारे शासन निर्णयाप्रमाणे करण्यात याव्यात. तसेच प्रमाण** संहिता **नियमावली १९८४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सरळसेवेच्या पदांकरीता** निश्चित केलेली शैक्षणिक **अर्हताच पदोन्नतीच्या पदांना सुध्दा लागू असेल.**

बाब ४: क्षितीज ध्यानी, M.Arch विद्यार्थ्यांकडून दंडपावती क्र. ४७५ ची रक्कम रू.२८/- महाविद्यालयात जमा करण्याबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, क्षितीज ध्यानी, M.Arch विद्यार्थ्यांकडून दंडपावती क्र. ४७५ ची रक्कम रू.२८/- महाविद्यालयात जमा करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

बाब ५: ऑल इंडिया टेनिस असोशिऐशन AITA व मुंबई विद्यापीठ यांच्यामध्ये झालेल्या सामजंस्य कराराचा पूर्नविचार करणेबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, ऑल इंडिया टेनिस असोशिऐशन AITA व मुंबई विद्यापीठ यांच्यामध्ये झालेल्या सामजंस्य करार रद्द करण्याबाबतच्या प्रक्रियेस मान्यता देण्यात आली.

बाब ६: व्यवस्थापन परिषदेस क्रीडा समिती (२०१५-१६ आणि २०१६-१७) गठीत करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी बाब.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, व्यवस्थापन परिषदेस क्रीडा समिती (२०१५-१६ आणि २०१६-१७) गठीत करण्याबाबतचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.

<u>बाब ७</u>: विद्यापीठ शिक्षक, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या बदलीनंतर, निवृत्तीनंतर, किंवा निधनानंतर सदनिका ताब्यात ठेवल्यास आकारण्यात येणाऱ्या दंडनीय दराबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठ शिक्षक, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या बदलीनंतर, निवृत्तीनंतर, किंवा निधनानंतर सदनिका ताब्यात ठेवल्यास आकारण्यात येणाऱ्या दंडनीय दर शासन निर्णय क्र. शानिवा-२५११/प्र.क्र.२३९/११/२३-अ दिनांक २९ जुलै, २०११ प्रमाणे लागू करण्यात यावेत.

<u>Item 8 :</u> Acceptance of New Norms /Statues frame by the Government with reference to the autonomy to be granted to the affiliated Colleges /Institutes.

Resolution: <u>It is Resolved</u> that New Norms /Statues frame by the Government with reference to the autonomy to be granted to the affiliated Colleges /Institutes <u>be accepted.</u>

<u>बाब ९:</u> मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व संस्था यांचेकडून प्रलंबित असलेल्या संलग्नता, नाव नोंदणी इत्यादि फी दंडासहीत आकारणी बाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व संस्था यांचेकडून प्रलंबित असलेल्या संलग्नता, नाव नोंदणी इत्यादि फी दंडासहीत आकारणी ही परिपत्रक No.Aff./Recog.I/189 of 2008 dated 17th May, 2008 and No.Aff./Recog./ICC/2012-13/17 dated 24th August, 2012 प्रमाणे करावी.

<u>Item 10:</u> To accept the minutes of the Advisory Committee of Garware Institute of Career Education and Development.

Resolution: It is Resolved that the minutes of the Advisory Committee of Garware Institute of Career Education and Development be accepted & Implemented.

<u>बाब ११</u>: लिपीक संवर्गात गट-ड कर्मचा-यांच्या मधून पदोन्नतीने भरावयाच्या पदांची मर्यादा संवर्ग संख्येच्या २५ टक्के वरून ५०टक्केपर्यंत वाढविण्याबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, लिपीक संवर्गात गट-ड कर्मचा-यांच्या मधून पदोन्नतीने भरावयाच्या पदांची मर्यादा संवर्ग संख्येच्या २५ टक्के वरून ५०टक्केपर्यंत वाढविण्याबाबत शासननिर्णय क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र.५७/२०१५/विसु-१ दिनांक १४ जानेवारी, २०१६ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

बाब १२: विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्याक्रमाच्या प्रवेशासाठी असलेली किमान गुणाची अट काढून टाकण्याबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, पारंपारिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी निकटतम कनिष्ठ परिक्षांमध्ये उत्तीर्णतिसाठी ठेवलेले किमान गुण मिळवून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून पुढे प्रवेश घेण्यास मान्यता देण्यात आली. तसेच विदयापीठाचे अध्यादेश, विनियम व नियम ( Ordinances, Rules & Regulations ) यांच्यामध्ये आवश्यक असलेल्या सुधारणा करण्यास / नविन अध्यादेश, विनियम व नियम करण्यास मान्यता देण्यात आली.

---

मान्यतेसाठी

| कुलगुरू | कुलसचिव | संचालक<br>(बी.सी.यु.डी) | उपकुलसचिव<br>(प्राधिकरणे) |
|---|---|---|---|